**<u>फिर्यादीतर्फे सा.क्र. १ फिर्यादी स्वत: यांचा पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विद्वान वकील श्री. डी.एम. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरू</u> -**

१. आरोपीविरुद्ध प्रस्तुत प्रकरण चालवण्याचा अधिकार मला संस्थेने दिला आहे.नि. २५ अ.क्र. १ वर त्या ठरावाची प्रत मी दाखल केलेली आहे. सदर ठरावाची मुळ प्रत अभिलेखावर दाखल असल्यामुळे त्यास **निशाणी ३४** देण्यात येते.आरोपी याने संस्थेच्या नावे धनादेश दिला होता. आता मला नि. २५ अ.क्र. २ वर दाखल केलेला धनादेश दाखविण्यात आला. त्या धनादेशावर आरोपीची सही आहे आणि तो धनादेश आरोपीच्या हस्ताक्षरात आहे. सदर धनादेशाची मुळ प्रत अभिलेखावर दाखल असल्यामुळे त्यास **नि. ३५** देण्यात येते. आरोपीने दिलेला धनादेश हा फिर्यादीने अहमदनगर डिस्ट्रीक सेंट्रल कॉऑपरेटीव्ह बॅक मध्ये वटण्यासाठी जमा केला होता. तो धनादेश आरोपीचे खाते असलेल्या बॅक ऑफ बडोदा मध्ये वटण्यासाठी पाठवण्यात आला होता. परंतु आरोपीच्या खात्यावर पुरेसा पैसा नसल्यामुळे वादातील धनादेश हा अनादरीत होउुन ''इनसफिसियंट बॅलन्स'' या शे-यानिशी परत आला होता. बॅक ऑफ बडोदाचा सदर मेमो मी नि. २५ वर अ.क्र. ४ वर दाखल केलेला आहे. सदर मेमो हा मुळ स्वरूपात असल्यामुळे त्यास **नि. ३६** देण्यात येते. त्यानंतर वादातील धनादेशाची रक्कम मागणीकरीता आरोपीला नोटीस पाठविण्यात आली होती. आता मला नि. ३ अ.क्र. ६ वरील नोटीस दाखविण्यात आली.ही तीच नोटीस आहे जी आरोपीला आमचे वकील श्री. डी. एम. जाधव यांच्यामार्फत पाठविली होती. त्या नोटीसीवर वकीलांची सही असुन त्यातील मजकुर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे आहे. सदर नोटीसीची स्थळ प्रत दाखल केली असल्यामुळे त्यास **नि. ३७** देण्यात येते.आता मला निशाणी २५ अ.क्र. ६ वरील कागद दाखविण्यात आला. तो कागद आरोपीला नोटीस आर. पी.ए.डी. ने पाठवल्याची पावती व आरोपीला नोटीस मिळाल्याची पोहोच असे दाखल केलेले आहेत. आर. पी.ए.डी. ची पावती ही मुळ स्वरूपात असल्यामुळे आणि पोहोचवर आरोपीची नोटीस स्वाकारणार म्हणुन सही आहे. पोहोच ही मुळ स्वरूपात दाखल केल्यामुळे त्यास अ.क्र. **नि. ३८ आणि ३९** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे उलटतपासाकरीता तहकुब</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती,
स्वाक्षरीत/-
(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.४, नेवासा.

दिनांक :११/०२/२०२६
नेवासा.